**प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना नियमित वैद्यकीय चाचण्यांची (Health Check-up Plan) सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

---

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 2774
Date: 12.10.2023

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०२१/2 849/प्र.१२**
**दिनांक : 09 OCT 2023**

**संदर्भ :** प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/वैखप्र/२०२१/२०४६/प्र.१२ दि. ०३.०८.२०२१.

**आ दे श**

१/- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सेवेतील, ४० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी दोन वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी करुन विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

२/- मुंबईस्थित कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी अपोलो क्लिनिक ,कुलाबा व अंधेरी, मुंबई हे रुग्णालय वैद्यकीय तपासणीसाठी अधिकृत करण्यात येत आहे. सदर चाचणीसाठी रु. ३८००/- (रुपये तीन हजार आठशे मात्र) इतकी रक्कम वैद्यकीय खर्च म्हणून मर्यादित करण्यात आली आहे. अधिकारी / कर्मचारी यांनी सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी व केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कार्यरत असलेल्या प्राधिकरण / मंडळ कार्यालयाकडून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वर्ग - ४ चे कर्मचाऱ्यांनी केलेल्या वैद्यकीय तपासणी शुल्काची प्रतिपूर्ती अपोलो क्लिनिककडून देयक प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून करण्यात यावी.

३/- मुंबईस्थित कार्यालये वगळता इतर प्रादेशिक कार्यालयातील ४० वर्षावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.भाप्रसे-२०१८/प्र.क्र.२५०/२०१८/९, दि. १५/१२/२०१८ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद रूग्णालये / संस्थांमधून दोन वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी करुन विहित नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. याकरीता संबंधित मुख्य अधिकारी यांनी संबंधित रुग्णालयांकडून वैद्यकीय तपासणीची सुविधा प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची संमती घेऊन रुग्णालय निश्चित करुन, संबंधित रुग्णालयाकडून रु. ३८००/- चे मर्यादेत दर निश्चित करुन घेणे आवश्यक राहील.

४/- शासन निर्णय दि. १५/१२/२०१८ मधील इतर अनुषंगिक अ. क्र. ४, ५, ६, ८, ९ मधील तरतूदी प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांना त्या त्या अनुषंगाने लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५/- सन २०२३ - २४ या वर्षासाठी माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२३ पर्यंत प्राधिकरणातील ४० वर्षावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय तपासण्या करुन विहित नमून्यातील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६/- सदर वैद्यकीय तपासणी चाचणी फक्त कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांकरीताच अनुज्ञेय आहे. त्यांच्यावर अवलंबित कुटुंबियांकरीता सदर सुविधा अनुज्ञेय नाही.

७/- सदर तपासणीची नोंद सेवापुस्तकात करणे बंधनकारक आहे. प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळातील कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवापुस्तकात नोंद घेतल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

सदरचे आदेश म्हाडा संकेतस्थळ https://mhada.gov.in वर उपलब्ध राहील.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण**
**यांचे मान्यतेने**

(राजकुमार सागर)
सचिव/प्राधिकरण

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१. मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मा. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मं.
३. मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४. वित्त नियंत्रक/प्रा.
५. विधी सल्लागार/प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८. मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं.,कोंकण,पुणे,नाशिक,औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ
९. चौकशी अधिकारी/प्रा.
१०. सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
११. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२. सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मंडळ
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१४. संचालक, पी.डी.सी. पुणे
१५. व्यवस्थापकीय संचालक/शि.पु.प्रा.
१६. सचिव/झो.पु.प्रा.

**प्रत:-** मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. यांना वेबसाईटवर अपलोड करणेसाठी.
**प्रत:-** प्रशासकीय अधिकारी,प्राधिकरण/मुंबई मंडळ/ मु.इ.दु.व पु.मं./ मु.झो.सु.मं./कोंकण / पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती मंडळ
**प्रत:-** कार्यासन अधिकारी/वित्त/प्रा.

**प्रत माहितीसाठी :-**

मा. अध्यक्ष/प्रा. यांचे खाजगी सहायक.
मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहायक.
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

**प्रत**: प्रशासन - ११ / १४ / प्रा.